॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बौध्दीक संपदा अधिकार चेअरच्या (आयपीआर चेअर) वतीने बौध्दीक संपदा अधिकार प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आला असून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या हस्ते या अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले.

विद्यापीठात आयपीआर चेअर स्थापन झालेले असून त्यांच्या वतीने ३० तासांचा हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. आठवड्यातून दोन तास ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने तो शिकविला जाणार आहे. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी २६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. चेअर प्रोफेसर प्रा.डी.जी. हुंडीवाले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. विकास गीते यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली. डॉ. सारंग बारी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ११ ऑक्टोबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी